# प्रकरण आठवे

# सारांश, निष्कर्ष आणि सूचना

# प्रकरण आठवे

# सारांश, निष्कर्ष आणि सूचना

## प्रस्तावना :

"माणगांव खेड्यातील बदलत्या बेरड समुदायाचा एक समाजशास्त्रीय अभ्यास" हा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे. प्रस्तुत लघुशोध प्रबंधाची विभागणी एकूण आठ प्रकरणात केलेली आहे. पहिल्या प्रकरणात प्रास्ताविक, दुसऱ्या प्रकरणात संशोधन साहित्याचा आढावा आणि संशोधन पद्धती, तिसऱ्या प्रकरणात बेरड समुदायाची पार्श्वभूमी चौथ्या प्रकरणात बेरड समुदायाचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन आणि बदल, पाचव्या प्रकरणात बेरड समुदायाचे आर्थिक, शैक्षणिक जीवन आणि बदल, सहाव्या प्रकरणात बेरड समुदायाचे धार्मिक, राजकीय जीवन आणि बदल, सातव्या प्रकरणात बेरड समुदायातील बदलासंबंधीची माहिती आणि शेवटच्या म्हणजे आठव्या प्रकरणात सारांश, निष्कर्ष आणि सुचना इत्यादी विभाग पाडून खालीलप्रमाणे मांडण्यात आले आहेत.

## प्रकरण पहिले : प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन अभ्यासाचे प्रास्ताविक सादर केलेले आहे. प्रास्ताविकमध्ये समाज व समाजाची विभागणी संदर्भात थोडक्यात माहिती दिलेली आहे. तसेच भटक्या विमूक्त जमाती विषयीची माहिती, 'भटक्या' या शब्दाची उत्पत्ती कशी झाली? 'भटके' म्हणजे काय ? भटक्या जमातींचे वर्गीकरण, भटक्या जमाती आणि विमूक्त जमातींची यादी, भटक्या जमातींवर हिंदू धर्माचा पडलेला प्रभाव, भटक्यातील कुटुंब व विवाह पद्धती, भारतातील पारंपरिक सामाजिक-आर्थिक व्यवहारातील भटक्यांचे स्थान, आधुनिकीकरण व औद्योगिकरण यांचा भटक्या जमातींवरील परिणाम, गुन्ह्यांचे विशिष्ट प्रकार, ब्रिटीश कालीन अवस्था व १८७१ सालचा क्रिमिनल ट्राईब ॲक्ट, भटक्यांची व विमूक्त जमातींची स्वातंत्र्यानंतरची स्थिती इत्यादीबाबतची माहिती दिलेली आहे.

## प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा आणि संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रकरणाची विभागणी दोन विभागात केली आहे. पहिल्या विभागात समर्पक उपलब्ध साहित्याच्या परिशिलनावरून आधीच्या संशोधनाच्या प्रमुख निष्कर्षांचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे. डॉ. भिमराव गस्ती, रामकृष्ण माने, रमाकांत रामचंद्र, लक्ष्मण माने, बाळकृष्ण रेणके, प्रा.मोतीराज राठोड, वृत्तरत्न सम्राट, कदम एन.डी., पाटील पंढरीनाथ, सिम्हाद्री व्हाय.सी., चव्हाण एस.एम., श्री मधुर सुधन जयरथ, चव्हाण रामनाथ इत्यादींचे ग्रंथ, पुस्तके, आत्मचरित्रे, लेख, स्वनुभव आदि साहित्यांचा आधार घेतलेला आहे.

दुसऱ्या विभागात प्रस्तुत अभ्यासासाठी अवलंबिण्यात आलेल्या संशोधन पद्धती विषयीचे विवेचन केलेले आहे. या विभागात अभ्यासाची विशिष्ट उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे ठरविण्यात आली होती.

१. वेरड समुदायाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचे अध्ययन करणे.

२. वेरड समुदायाच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनाचे अध्ययन करणे.

३. वेरड समुदायाचे शैक्षणिक आणि धार्मिक जीवन जाणून घेणे.

४. वेरड समुदायाचे आर्थिक आणि राजकीय परिस्थिती जाणून घेणे.

५. वेरड समुदायामधील काही बदल झाल्यास त्याचा अभ्यास करणे.

प्रस्तुत अभ्यासासाठी चंदगड तालूक्यातील माणगांव खेड्यातील वेरड समुदायाची यादृच्छिक नमुना निवड (Random Sampling technique) या तंत्राच्या सहाय्याने निवड करण्यात आली. माणगांव खेड्यातील ग्रामपंचायतीच्या कार्यालयातून मिळालेल्या माहितीनुसार माणगाव खेड्याची लोकसंख्या ३६२१ इतकी आहे. त्यापैकी वेरड समुदायाची लोकसंख्या ९५२ इतकी असून त्यांची घरे / कुटुंबे २५0 इतकी आहेत. तेव्हा संशोधकाजवळ असणारा वेळ आणि पैसा या गोष्टी ध्यानात घेऊन वेरड समुदायातील २0% वेरड समुदायामध्ये राहणाऱ्या कुटुंबाचा नमुण्यात समावेश करण्याचे ठरविले. त्यापैकी व्यवस्थावद्ध नमुना निवड (systematic) या तंत्राचा अवलंब करण्यात आला. प्रथमत: वेरड समुदायातील कुटुंबाच्या

यादीतील एक ते पाच क्रमांच्या कुटुंबापैकी लॉटरी पद्धतीने ५ क्रमांकाच्या कुटुंबाची निवड केली. त्यानंतर ५, १0, १५ या क्रमाने एकूण ५0 कुटुंबाची निवड केली.

याच विभागात सैद्धांतिक दृष्टीकोनाचे विवेचन केलेले आहे. यामध्ये विशिष्ट अशा एका दृष्टीकोनाचा वापर न करता वेगवेगळ्या विचारवंतानी, संशोधकानी वापरलेले वेगवेगळे सैद्धांतिक दृष्टीकोन वापरून प्रस्तुत अभ्यास विषयाचा समाजशास्त्रीय अभ्यास केलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने संरचनात्मक प्रकार्यात्मक दृष्टीकोन व तुलनात्मक दृष्टीकोनाचा वापर केलेला आहे.

## प्रकरण तिसरे : बेरड समुदायाची पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणात बेरड समाजाच्या पार्श्वभूमीचा आढावा घेतलेला आहे. त्यामध्ये माणगांव खेड्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, लोकसंख्या, साक्षरता, स्थान, स्थिती व भौगोलिक परिस्थिती आणि माणगांव खेड्यातील बेरड समुदायातील काही क्रांतीकारक व समाज सुधारकाविषयीची माहिती इत्यादींचा आढावा घेतलेला आहे.

## प्रकरण चौथे : बेरड समुदायाचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन आणि बदल

प्रस्तुत प्रकरणात बेरड समुदायाचे सामाजिक-सांस्कृतिक जीवन आणि बदल झालेल्याचा आढावा घेतलेला आहे. यामध्ये माणगांव खेड्यातील बेरड समुदायाची एकूण लोकसंख्या (पुरूष, स्त्रिया, मुले व मुली), बेरड समुदायातील उत्तरदात्यांची वयोगटानुसार विभागणी, त्यांची वैवाहिक स्थिती त्यांच्यातील साक्षरता प्रमाण, त्यांची कुटुंबसंस्था व विवाहसंस्था तसेच त्यांच्या व्यवसायाबद्दलची सखोल माहिती या प्रकरणात दिलेली आहे.

## प्रकरण पाचवे : बेरड समुदायाचे आर्थिक, शैक्षणिक जीवन आणि बदल

प्रस्तुत प्रकरणामध्ये बेरड समुदायाच्या आर्थिक, शैक्षणिक जीवनाचा आढावा घेऊन त्यामध्ये काही बदल झालेल्याची माहिती दिलेली आहे. बेरड समुदायातील लोकांच्या व्यवसायांसांबंधीची माहिती, त्याचे मासिक उत्पन्न व खर्चासंबंधीची माहिती दिली आहे. तसेच शिक्षणाबद्दलची पूर्वीची व सद्यपरिस्थितीमध्ये असलेली मते, बेरड समुदायामध्ये शिकलेल्या

मुलींचे स्थान, बेरड लोकांच्या घरातील वस्तू किंवा साहित्य, त्यांच्यातील दळण-वळणाची भौतिक साधने, इत्यादी बाबींविषयीची चर्चा करण्यात आलेली आहे.

## प्रकरण सहावे : बेरड समुदायाचे धार्मिक, राजकीय जीवन आणि बदल

प्रस्तुत प्रकरणात बेरड समुदायाचे धार्मिक, राजकीय जीवन आणि बदल झाल्याच्या माहितीचा आढावा घेतलेला आहे. यामध्ये बेरड समुदायातील लोकांच्या कुलदेवताविषयीची माहिती, त्यांच्यातील धार्मिक विधीविषयीची माहिती, धार्मिक विधीमधील स्त्रियांची भूमिका, बेरड समुदायातील बेरड लोकांना गावच्या ग्रामपंचायतीमध्ये व राजकारणामध्ये असलेले स्थान, बेरड समुदायासाठी गावाच्या ग्रामपंचायतीने व सरकारने योजलेल्या योजना, राजकारणातील बेरड स्त्रियांचा प्रवेश इ.बाबतची चर्चा केली आहे. तसेच बेरड समुदायामध्ये काही बदल झाल्याची माहिती यामध्ये बेरड समुदायातील शिक्षेचे स्वरूप, बेरड लोकांचा नागरी जीवनासंबंधीचा दृष्टीकोन, त्यांचा सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रमामधील सहभाग, धार्मिक व्यवहार, सण-उत्सव कार्यक्रम याबाबतचा दृष्टीकोन, राजकीय जाणिव आणि सहभाग, बेरड समुदायावरील नागरी जीवनाचे परिणाम तसेच त्यांच्या सामाजिक स्तरीकरणाचे स्वरूप इत्यादी विषयीची माहिती या प्रकरणामध्ये दिलेली आहे.

## प्रकरण सातवे : बेरड समुदायातील बदलासंबंधीची माहिती

प्रस्तुत प्रकरणामध्ये बदलत्या काळानुसार बेरड समुदायामध्ये बदल झालेल्या माहितीचा आढावा घेऊन पूर्वीची व सद्यपरिस्थितीची तुलना करून वस्तुनिष्ठ अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## प्रकरण आठवे : सारांश, निष्कर्ष आणि सूचना

प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी निवडलेल्या अभ्यास विषयाच्या उद्दीष्टानुसार संशोधन आणि संशोधन निष्पत्तीनंतर निवडलेल्या अभ्यास विषयाचे सारांश, निष्कर्ष आणि सूचना मांडलेल्या आहेत.

१. मध्ययुगीन काळापासून बेरड या जमातीचे अस्तित्व आहे. इतिहासामध्ये या जमातीचा उल्लेख आढळतो.

२. वेरड जमातीला पूर्वी गुन्हेगारी जमात म्हणून ओळखले जात होते. या जातीला गावगाड्यामध्ये उपजिविकेसाठी फिरताना खूप त्रास दिला जात होता. परंतु सद्यपरिस्थितीत त्यांच्या स्थितीत बदल झाल्याने त्यांना कोणताही त्रास दिला जात नाही ही जात सध्या अभिमानाने आपले जिवन जगत आहे. ती सध्या महाराष्ट्र राज्यात विमूक्त जमात म्हणून ओळखली जाते.

३. वेरड समुदायाचे मुलाखत अनुसूचिद्वारे सर्वेक्षण केल्यानंतर असे दिसते की माणगांव गावातील अनुसूचित जातीपेक्षा वेरड समुदायाची लोकसंख्या माणगांव गावामध्ये जास्त आहे. तर वेरड समुदायामध्ये वयस्कर लोकांची संख्या खुपच कमी आहे.

४. वेरड समुदायातील लोक हे मराठी व कन्नड अशा दोन्ही भाषा बोलतात. मराठी ही भाषा बाहेरच्या व्यक्तींशी संपर्क साधताना वापरतात. तर कन्नड ही भाषा आपल्या कुटुंबामध्ये व आपल्या समुदायामध्ये वापरतात. कुटुंबातील व्यक्ती एकमेकांशी कन्नड भाषेमधूनच आंतरक्रिया करतात.

५. मुलाखत अनुसूचीच्या सर्वेक्षणानंतर असे दिसून आले की बहुतांशी लोक हे निरक्षर अज्ञानी आहेत. त्याचे कारण म्हणजे त्यांच्यामध्ये सामाजिक जाणिव नसणे हे होय. परंतु सद्यपरिस्थितीत त्यांची मुले साक्षर असलेली दिसून येतात.

६. पूर्वी वेरड समुदायामध्ये संयुक्त कुटुंबाची संख्या जास्त होती तर सद्यपरिस्थितीत विभक्त कुटुंबाची संख्या जास्त असलेली दिसून येते. हळूहळू विभक्त कुटुंबे लोप पावत चाललेली आहेत. वेरड ह्या जातीत पूर्वी पितृसत्ताक कुटुंब पद्धत अस्तित्वात होती सद्यपरिस्थितीत ही ती अस्तित्वात आहे.

७. काही वेरड लोकांचे जन्मस्थळ हे चंदगड तालूक्यातील माणगांव हे गाव तर काहीचे कर्नाटक राज्यातील बेळगाव हे शहर असलेले दिसून येते. यामध्ये माणगांव हे गाव जन्मस्थळ असलेल्यांची संख्या जास्त आहे. तसेच हे लोक आपल्या जन्मस्थळाशी अजूनही संपर्क साधतात.

८. बहुतांशी वेरड लोक अजूनही पारंपरिक पद्धतीनेच लग्न करतात. या लोकांतील बरेच

लोक पारंपरिक पद्धतीत वदल करायला तयार नाहीत. पूर्वी विवाह विधी दोन दिवस चालत होता. सद्यपरिस्थितीतही दोनच दिवस चालता.

९. पूर्वी मुला-मुलींचे विवाह लहान वयात होत होते. परंतु सद्यपरिस्थितीत मात्र त्यामध्ये वदल झालेला दिसून येतो. पूर्वी मुलींचे विवाह पाच ते दहा वर्षात केले जात होते. तर सद्यपरिस्थितीत मुलीचे विवाह वयाच्या १६ ते २० वर्षानंतर केले जाते. तसेच मुलांचे विवाह पूर्वी वयाच्या १० ते १५ वर्षात केले जात असत तर सद्यपरिस्थितीत त्यांचे विवाह वयाच्या २१ ते ३० वर्षानंतर केले जाते.

१०. पूर्वी कमी वयात विवाह होण्याची कारणे म्हणजे सामाजिक-सांस्कृतिक परिस्थिती, पारंपरिक विवाह पद्धती आणि अज्ञान, निरक्षर व अंधश्रद्धा ही होती. परंतू सद्यपरिस्थितीत वदल झाला आहे त्याची कारणे म्हणजे वदलती सामाजिक परिस्थिती, शिक्षणाचा प्रसार आणि आधुनिकीकरणाची व शहरीकरणाची प्रक्रिया ही आहेत.

११. पूर्वी मुलींच्या निवडीवावत विशिष्ट गोष्टींना महत्त्व दिले जात होते. या निवडीमध्ये घरकाम करणाऱ्या मुलींना अग्रगण्यस्थान दिले जात होते. तर शिक्षण व सुसंस्कृत असलेल्या मुलींना दुय्यम महत्त्व दिले जात होते. परंतु सद्यपरिस्थितीत मात्र मुलींच्या शिक्षणाला अग्रगण्य स्थान दिले जाते तर घरकाम करणारी व सुसंस्कृत असलेल्या मुलींना दुय्यम स्थान दिले जाते.

१२. मुलाखत अनुसूचीच्या सर्वेक्षणानंतर पूर्वी मुला-मुलींच्या भावी साथीदारावावत मुलांची मते विचारात घेतली जात नव्हती त्याचे कारण म्हणजे त्यांच्या मताना किंवा विचारांना महत्त्व दिले जात नव्हते, त्यांना त्यावावतचा अधिकार दिला गेला नव्हता. तसेच त्यांच्यात निर्णयक्षमता विकसित झाली नसल्याने त्यांच्या मतांना स्थान दिले जात नव्हते. परंतु सद्यपरिस्थितीत विवाहाचे वय वाढवल्यामुळे त्यांच्यात भावी जोडीदाराच्यावावत निर्णय घेण्याची क्षमता असल्याने तसेच त्यांच्या मतानासुद्धा महत्त्व आल्याने आणि संपूर्ण आयुष्य एकमेकांसोवत काढावयाचे असल्याने त्यांची मते विचारात घेतली जातात.

१३. बेरड समुदायातील लोक पूर्वी आपल्या मुला-मुलींची लग्न आपल्याच नात्यामध्ये करत असत. कारण त्यांची अशी समजूत होती की आपल्याच नात्यामध्ये मुला-मुलींचे लग्न केल्याने आपल्यातील नातेसंबंध दृढ होतील, अडीअडचणीच्या काळात एकमेकांना मदत होईल. तसेच आपलीच मुलगी आपल्याच घरात येईल या हेतूने तर काही लोक आर्थिक परिस्थिती नसल्याने आपल्याच नात्यामध्ये मुलामुलींचे लग्न करत असत. यामध्ये बहुतांशी लोक आपल्यातील नाते संबंध दृढ होण्यासाठी आपल्या मुलांची लग्ने आपल्याच नातेसंबंधामध्ये करत असत, आजही ही परिस्थिती किंवा पद्धत अस्तित्वात आहे.

१४. सर्वेक्षणानंतर असे दिसून येते की बेरड जमातीतील लोक पूर्वी हुंडा पद्धतीला मान्यता देताना दिसतात. त्यापाठीमागचे कारण म्हणजे त्यांच्यात पारंपरिक पद्धतीने हुंडा दिला-घेतला जात होता. ह्या जातीत हुंडा व वधूमूल्य ह्या प्रथा काही प्रमाणात अजूनही सुरू आहेत.

१५. मुलाखत अनुसूचीच्या सर्वेक्षणानंतर असे दिसून येते की ह्या जमातीत पुनर्विवाह होत होते. कारण त्यांच्या समुदायात त्यांना कायद्याने मान्यता होती तसेच मुलांचे पालन पोषन करण्यासाठी पुनर्विवाह करत होते. सद्यपरिस्थितीतही ही पद्धत असलेली दिसून येते.

१६. पूर्वी बेरड समुदायामध्ये बर्हिविवाह होत नव्हते कारण तशी समाजव्यवस्था नव्हती. जातीव्यवस्था अधिक ताठर होती. सद्यपरिस्थितीत ही त्यांच्यामध्ये बर्हिविवाह होत नाहीत कारण जशी पूर्वी समाजव्यवस्था होती तशी ती आजही टिकून आहे. आजही विवाह करण्याच्या बाबतीत जातीव्यवस्था मानली जाते, पाळली जाते. विवाहाच्या बाबतीत समाजव्यवस्थेत म्हणावे तितके समाज प्रबोधन झालेले नाही. बेरड जमात ही एक अंतर्विवाही जमात आहे. पूर्वी बेरड जातीमध्ये ॲरेंज मॅरेज (पारंपरिक विवाह पद्धत) ही पद्धत अस्तित्वात होती ती सद्यपरिस्थितीत ही अस्तित्वात आहे. म्हणजेच विवाह संस्थेत कोणताच बदल झालेला दिसून येत नाही. समाज व्यवस्थेच्या भौतिक

घटकात बदल खूप मोठ्या प्रमाणात झालेला आहे पण अभौतिक (मानसिकता) घटकात म्हणावा तेवढा वदल झालेला नाही.

१७. पूर्वी बेरड समुदायामध्ये घटस्फोट रूढ होता तो आज ही रूढ आहे. पूर्वी हा घटस्फोट वेरड समुदायातील जात पंचायत मार्फत दिला जात होता परंतु सद्यपरिस्थितीत घटस्फोट कोर्टामार्फत दिला जातो. पूर्वी घटस्फोटानंतर मुलांची जवावदारी ही पत्नीकडे दिली जात असे सद्यपरिस्थितीत ही तिच्याकडेच दिली जाते.

१८. मुलाखत अनुसूचीच्या सर्वेक्षणानंतर असे दिसून येते की पूर्वी वेरड समुदायातील लोक लग्नासाठी ५00 रूपयापासून ते १000 रूपयापर्यंत रूपये खर्च करत होते. परंतु सद्यपरिस्थितीत खूप मोठा वदल झाल्याचे दिसून येते. सर्वसामान्य व्यक्तीसुद्धा मुलांच्या लग्नासाठी कमीत कमी ५0,000 रूपयापासून जास्तीत जास्त १,00,000 पर्यंत खर्च करत असल्याचे दिसून येते. त्याचे कारण म्हणजे आर्थिक परिस्थितीनुसार खर्च किंवा सामाजिक प्रतिष्ठा असेल या घटकांना दिले गेलेले महत्त्व होय.

१९. पूर्वी बेरड जमातीमध्ये कुटुंव नियोजनाचे नियम अस्तित्वात नव्हते. कारण वेरड समुदायातील लोकांची समजूत अशी होती की जेवढी कुटुंवातील सदस्यांची संख्या जास्त तेवढे उत्पन्नाच्या प्रमाणात वाढ होते. तसेच समाजामध्ये वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी सुद्धा मदत होते. परंतु सद्यपरिस्थितीत या कल्पनेला अजिवात स्थान राहिलेले नाही. वेरड समुदायातील लोकांमध्ये लोकसंख्येवावत जागृती होऊन ते इतर समाजाप्रमाणे कुटुंव नियोजनाचे नियम पाळत आहेत.

२०. इतर समुदायाप्रमाणे माणगाव खेडयातील वेरड समुदायामध्ये विशिष्ट असा जात प्रमुख नव्हता आणि तो सद्यपरिस्थितीत नाही. कारण तशी त्यांच्यामध्ये जात प्रमुखाला समाज मान्यता नव्हती. तसेच पूर्वी वेरड समुदायाची विशिष्ट अशी जातपंचायत होती परंतु सद्यपरिस्थितीत जातपंचायतीचे अस्तित्व टिकून राहिलेले नाही. ती पूर्णत: लोप पावलेली आहे. अनुसूचित जाती-जमातीचे जसे समाजमंदीर असते तसे माणगांव खेडयातील वेरड समुदायाचे समाज मंदीर नाही.

२१. पूर्वी वेरड जातीचे व इतर जातींच्या व्यक्तीमध्ये भांडणे होत होती सद्यपरिस्थितीत त्याचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते. त्याचबरोबर पूर्वी वेरड जातीतील लोकांमध्येसुद्धा भांडणे होत होती आणि त्याचेही प्रमाण जास्त होते त्याची कारणे म्हणजे भाऊवंदकी आणि एकमेकांबद्दलची इर्षा ही होय. परंतु सद्यस्थितीत मात्र त्याचेही प्रमाण कमी झालेचे दिसून येते.

२२. पूर्वी वेरड समुदायामध्ये मुलांना दत्तक घेण्याची प्रथा काही प्रमाणात रूढ होती परंतु सद्यपरिस्थितीत तिचे अस्तित्व राहिलेले नाही.

२३. या जमातीत स्त्री-पुरूषांचा व्यभिचार मान्य केला जात नाही. या गुन्ह्यांसाठी वेरड समुदायात कडक शिक्षा आढळतात. पूर्वी वेरड समुदायातील शिक्षेचे स्वरूप हे गंभीर असलेले दिसून येते परंतु सद्यपरिस्थितीत गुन्ह्याचे स्वरूप पाहून त्यांची शिक्षा ठरवली जाते.

२४. पूर्वी वेरड जातींच्या लोकांचा जो व्यवसाय होता त्या व्यवसायात ते सुधारणा करू इच्छितात कारण त्यांना परंपरागत व्यवसायामधून योग्य ते उत्पन्न मिळत नाही. त्याचप्रमाणे पूर्वी वेरड समुदायातील लोक आपल्या व्यवसायाला जोडधंदा म्हणून जनावरे पाळत होते परंतु सद्यपरिस्थितीत जनावरे पाळणाऱ्यांच्या संख्येमध्ये घट झालेली दिसून येते.

२५. पूर्वी वेरड़ लोक सहकारी सोसायटीचे सदस्य अजिवात होत नसत, कारण त्यांना सहकारी सोसायटी बाबतचे ज्ञान आणि त्याबद्दलची माहित नव्हती. परंतु सद्यपरिस्थितीत मात्र त्यांना सहकारी सोसायटीचे महत्त्व कळू लागल्याने त्यांच्या सहकारी सोसायटींच्या सदस्य संख्येत लक्षणीय वाढ झाल्याची दिसून येते.

२६. पूर्वी वेरड समुदायातील लोक घर बांधण्यासाठी, मुलांचे लग्न करण्यासाठी किंवा इतर वस्तू घेण्यासाठी आपल्या नात्यातील लोकांकडून, पाहूण्यांकडून कर्ज घेत असत. परंतु सद्यपरिस्थितीत त्यामध्ये बदल होऊन ते बँक व सोसायटी यांच्याकडून कर्ज घेतात.

२७. वेरड समुदायामध्ये धार्मिक विधी करण्यासाठी खास असा भगत नाही. ते देवाची पूजा स्वत: करतात. त्यांच्यामध्ये यात्रेला कोंबड्याचा व वकऱ्यांचा वळी दिला जातो. ही पद्धत आजही अस्तित्वात आहे. या जातीत नवस वोलण्याची व नवस फेडण्याची प्रथा आहे.

२८. पूर्वी वेरड समुदायातील लोक जादूटोणा, भुतप्रेत, आत्मा यावर विश्वास ठेवत होते. परंतु सद्यपरिस्थितीत त्यांच्यात समाज प्रबोधन झाल्याने या गोष्टीवर ते विश्वास ठेवत नाहीत. पूर्वी त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धेचे जाळे होते ते सद्यपरिस्थितीत कमी होत चालले आहे.

२९. पूर्वी धर्मामध्ये व एकूणच समाजव्यवस्थेमध्ये वेरड स्त्रियांची भूमिका ही गौण (कनिष्ठ) असलेली दिसून येते. तर सद्यपरिस्थितीमध्ये त्यांच्या भूमिकेत वदल होऊन ती उच्च असलेली दिसते. तिला सर्व क्षेत्रामध्ये पुरूषाप्रमाणे वरोवरीचा दर्जा दिला जातो.

३०. मुलाखत अनुसूचिच्या सर्वेक्षणानंतर असे दिसून येते की पूर्वी वेरड समुदायात लोकगितांचा कार्यक्रम होत होता. वेरड लोक नाटक, सिनेमा वारंवार पाहत होते परंतु सद्यपरिस्थितीत लोकगितांचा कार्यक्रम होत नाही. पूर्वीसारखे नाटक, सिनेमा इत्यादी कार्यक्रम वेळ मिळत नसल्यामुळे ते पाहत नाहीत.

३१. वेरड समुदायातील लोक पूर्वी खादी व सुती प्रकारचे कपडे वापरत होते पण आजच्या स्थितीत ते टॅरिकॉट उलन सारख्या प्रकारचे कपडे वापरतात. या जातीतील स्त्रिया पूर्वी मंगळसूत्र, जोडणी, पाटल्या, भोरमाळ, साज, वेण इत्यादी प्रकारचे दागिने वापरत असत. परंतु सद्यपरिस्थितीत अशा जड प्रकारच्या दागिण्याऐवजी हलक्या व नविन प्रकारचे दागिने वापरताना दिसतात. सुपारी, पान, हळदी कुंकू या गोष्टींना या समाजात महत्त्व आहे.

३२. पूर्वी वेरड समुदायातील लोक गावच्या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत सदस्य म्हणून होते. त्याचप्रमाणे आजही आहेत तसेच पूर्वी वेरड समुदायातील स्त्री ग्रामपंचायतीमध्ये सदस्य म्हणून नव्हती पण ती सद्यपरिस्थितीत आहे.

३३. पूर्वी गावच्या ग्रामपंचायतीने बेरड समुदायातील लोकांसाठी कोणतीच कामे केलेली नव्हती. एकंदरीत त्यांच्याकडे दुर्लक्ष केलेले होते. परंतु सद्यपरिस्थितीमध्ये गावच्या ग्रामपंचायतीने त्यांच्यासाठी आवश्यक असणारी सर्व कामे केलेली आहे. उदा. पाण्याची सोय, दिवाबत्तीची सोय, गटारांची सोय, रस्त्यांची सोय इत्यादी.

३४. मुलाखत अनुसूचिच्या सर्वेक्षणानंतर असे दिसून येते की पूर्वी बेरड समुदायासाठी कोणत्याही प्रकारच्या योजना राबविलेल्या नव्हत्या पण सद्यपरिस्थितीत काही प्रमाणात योजना राबविल्या गेलेल्या दिसतात. उदा.घरकूल योजना, इंदिरा गांधी निवास योजना, ग्रामीण भूमिहीन योजना इत्यादी.

३५. मागासलेली विमुक्त जमात म्हणून या लोकांना शैक्षणिक सवलती, शासकीय नोकरीतील सवलती मिळतात.

३६. पूर्वी बेरड समुदायातील लोकांना राजकारणामध्ये आवड नव्हती परंतु सद्यपरिस्थितीत त्यांना राजकारणामध्ये आवड आहे व ते त्यामध्ये सहभागी होत असल्याचे दिसून येते. पूर्वी बेरड स्त्रीचा राजकारणात प्रवेश अयोग्य मानला जायचा पण आज तिचा प्रवेश योग्य मानतात. आजच्या स्थितीत स्त्रीकडे बघण्याचा समाजाच्या दृष्टीकोनात बदल झालेला आहे.

३७. बेरड समुदायातील लोकांच्या मुलाखती घेतल्यानंतर असे दिसून आले की त्यांचे ग्रामीण जीवन सुधारण्यासाठी सरकारने जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, शिक्षणाच्या सोईमध्ये वाढ करणे गरजेचे आहे, दळणवळणाच्या सोईमध्ये वाढ करणे अत्यावश्यक आहे.

३८. पूर्वी बेरड समुदायातील लोक रेडिओ ऐकत होते. स्वतःच्या घरी रेडिओ नसेल तर ते दुसऱ्याच्या घरी जाऊन रेडिओ ऐकत असत परंतु त्या परिस्थितीत आता खूप मोठा बदल झाला आहे. रेडिओची जागा टी.व्ही. ने घेतला आहे. आज प्रत्येकाच्या घरी टी.व्ही., ट्यूबलाईट, फॅन, टेपरेकॉर्डर इत्यादी वस्तू प्रामुख्याने असलेल्या दिसून येतात.

३९. बेरड समुदायातील लोक पूर्वी वर्तमानपत्र वाचत नव्हते, त्यापाठीमागचे कारण म्हणजे मुळातच ते अज्ञानी होते, त्यांना वाचता येत नव्हते आणि दुसरे म्हणजे तेव्हा त्यांच्या समुदायामध्ये वर्तमानपत्रेच उपलब्ध होत नव्हती. पण सद्यपरिस्थितीत बेरड लोकांची मुले वर्तमान पत्र वाचतात. पूर्वी वाचनालयची सोय नव्हती. पण सद्या त्यांच्या समुदायात वाचनालयाची सोय आहे.

४०. पूर्वी बेरड समुदायामध्ये सामाजिक स्तरीकरणाचे स्वरूप हे उत्पन्नावरून ठरत होते. तर सद्यपरिस्थितीत ते शिक्षणावरून ठरते.

४१. बेरड समुदायातील लोकांना पूर्वी उच्च वर्गातील लोकांच्या घरामध्ये प्रवेश दिला जात नव्हता. परंतु त्या परिस्थितीत बदल होऊन त्यांना प्रवेश दिला जातो तसेच उच्च वर्णातील लोक बेरड समुदायातील लोकांच्या घरात प्रवेश करतात, उठतात, बसतात, खातात, चहा पितात, पाणी पितात आदि कृती करतात.

४२. पूर्वी बेरड समुदायातील लोक सामाजिक मंडळांचे सदस्य होताना दिसत नाहीत पण सद्यपरिस्थितीत ते वेगवेगळ्या सामाजिक मंडळांचे सदस्य होताना दिसतात.

४३. पूर्वी बेरड समुदायातील बेरड लोकांचे शिक्षणाबद्दलचे मत हे अयोग्य असलेले दिसून येते. याची कारणे म्हणजे त्यांच्या मते, शिक्षणामुळे कोणताच फायदा होत नाही, शिक्षणाला जास्त खर्च होतो तर शिक्षणामुळे सुशिक्षित बेकारीमध्ये वाढ होते. सद्यपरिस्थितीमध्ये मात्र बेरड लोकांमध्ये शिक्षणाबद्दलचे योग्य, चांगले मत असलेले दिसून येते त्यापाठीमागची कारणे म्हणजे त्यांच्या मते, शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगिण विकास होतो, शिक्षणामुळे व्यक्तीला आपल्या हक्कांची, अधिकारांची, कर्तव्यांची जाणीव होते आणि शिक्षणामुळे व्यक्ती आपला दर्जा सुधारू शकते इ. होत.

४४. पूर्वी बेरड समुदायातील मुलींना शिक्षण घेण्याची मान्यता नव्हती पण सद्यपरिस्थितीत मात्र बेरड समुदायातील मुलींना शिक्षण घेण्याची मान्यता आहे. त्या आपल्या इच्छेनुसार कोणतेही आणि कितीही शिक्षण घेऊ शकतात. पूर्वी बेरड समुदायात शिकलेल्या बेरड मुलीचे स्थान अत्यंत गौण, कनिष्ठ होते पण आज शिकलेल्या मुलीचे

स्थान उच्च आहे. तिचे समाजात भरभरून कौतुक केले जाते.

४५. नागरी जीवनामुळे वेरड समुदायामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेला दिसून येतो. वेरड समुदायातील लोकांना दळणवळणाच्या सोई, शिक्षणाच्या सोई, रोजगाराची उपलब्थता, तसेच व्यक्तीमत्त्वाचा विकास करणाऱ्या साधनांचा उपयोग होऊन त्यांच्या राहणीमानात सुधारणा झालेल्या दिसून येतात. एकंदरीत नागरी जीवनाचे त्यांच्यावर चांगले परिणाम झालेले आहेत.

वरील प्रमाणे वेरड जातीची लोकसंख्या, वैवाहिक स्थिती, व्यवसाय, शिक्षण, सामाजिक सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय आणि त्यांच्यातील झालेल्या बदला संबंधीचे निष्कर्ष मांडलेले आहेत.

## समस्या आणि सुचना :

१. वेरड समुदायामध्ये कमी-जास्त प्रमाणात विधवा व विधूर यांची संख्या आढळते. त्यामध्ये काही विधवा व विधूर हे वयस्कर असूनही आपल्या कुटुंबापासून विभक्त आहेत. तेव्हा त्यांच्याकडे त्यांचे कुटुंब म्हणावे तितके लक्ष देत नाहीत. त्याचा परिणाम म्हणजे ते अत्यंत निकृष्ट पद्धतीचे व एकटेपणाचे जीवन जगता आहेत. तेव्हा त्यांच्याकडे गावच्या ग्रामपंचायतीने कायद्याच्या कसोटीत त्यांच्यासाठी काही सुविधा उपलब्ध करून देता येतील का ते पहावे. तसेच शासनानेही कानाडोळा न करता या विमूक्त जमातीतील वयस्कर व निराधार व्यक्तींसाठी काही योजना सुरू कराव्यात.

२. वेरड समुदायामध्ये वेरड समुदायातील लोक व इतर जातीतील लोकांमध्ये तसेच वेरड जातीतील लोकां-लोकांमध्ये सुद्धा पूर्वीपासूनच भांडणे होत होती. ती आजसुद्धा काही कमी जास्त प्रमाणात होताना दिसतात. याचाच अर्थ असा की पूर्वीपासूनच एकमेकांबद्दल असणारा पूर्वग्रह दृष्टीकोन, जुने विचार, एकमेकांबद्दलची इर्षा, उच्च-निच्चतेची भावना ह्या बाबी अजूनही इतर समाजातील लोकांमध्ये व वेरड समुदायातील लोकांच्या मनामध्ये तशाच साठून आहेत. याचा परिणाम असा होत आहे

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

की परिस्थिती बदलत आहे, भौतिक घटकात बदल होत आहेत. परंतु बदलत्या परिस्थितीनुसार त्यांच्या व इतर समाजातील लोकांच्या मनातील असलेले विचार, दृष्टीकोन, भावना बदलताना दिसत नाही. परिणामी बेरड समुदायाच्या व इतर समाजाच्या प्रगतीमध्ये अडसर निर्माण होत आहे. तेव्हा हा अडसर दूर करण्यासाठी समाजप्रबोधनाची नितांत आवश्यकता आहे.

३. बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार जरी बेरड समुदाय बदलत असला तरी बेरड समुदायामधील अनेक अशा बाबी आहेत, त्या अजूनही बदलताना दिसत नाहीत. अजूनही बेरड लोक विवाह, सण, उत्सव, यात्रा इ. पारंपरिक पद्धतीनेच करताना दिसतात. याचा परिणाम असा होतो आहे की बेरड समुदायातील लोकांच्या भौतिक घटकात बदल मोठ्या प्रमाणात होत आहे परंतु अभौतिक घटकात मात्र बदल होताना दिसत नाही. जर होत असेल तर तो फारच मंद गतीने होत आहे. तेव्हा बेरड समुदायातील लोकांच्या मनामधील विचार जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने त्यांच्यात बदल होत आहे असे म्हणणे योग्य नाही. तेव्हा वेगवेगळ्या पद्धतीने समाजातील वेगवेगळ्या घटकांनी किंबहूना बेरड समुदायातील शिकलेल्या व्यक्तींनीच त्यांच्या विचारामध्ये परिवर्तन आणून त्यांच्यामध्ये समाज प्रबोधन घडवून वैचारिक पातळी निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे.

४. बेरड ही जमात सद्या विमुक्त जमात म्हणून महाराष्ट्रात ओळखली जाते. पण राज्य शासनाची आणि केंद्र शासनाची जातीनिहाय सूची पाहिली तर या दोहोंच्या सूचीमध्ये फार तफावत दिसून येते. या तफावतीमुळे धक्कादायक माहिती आपल्या डोळ्यासमोर येते. सदर बेरड जातीचा महाराष्ट्र व तमिळनाडूमध्ये विमुक्त जमातीमध्ये समावेश (DNT) केला आहे. तर याच बेरड जातीचा समावेश आंध्र प्रदेश, दिल्ली, ओरिसा, बंगाल व राजस्थान इ. राज्यामध्ये अनुसूचित जातीमध्ये म्हणजेच SC मध्ये केलेला आहे. त्याचप्रमाणे कर्नाटक, उत्तरप्रदेश, गुजरात, बिहार, हिमाचल प्रदेश या राज्यांमध्ये अनुसूचित जमातीमध्ये ST म्हणजेच मध्ये केलेला आहे. तेव्हा

महाराष्ट्रातील बेरड जातीवर अन्याय झालेला दिसतो. तेव्हा राज्यशासनाने व केंद्रशासनाने या बाबीवर महत्त्वपूर्ण विचार विनिमय आणि संशोधन करून सदर बेरड जातीवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ न देता योग्य निर्णय घ्यावा किंवा या जातीला योग्य प्रकारचा न्याय द्यावा.

५. बेरड समुदायातील लोकांना अजूनही त्यांचा स्वत:चा असा व्यवसाय उपलब्ध नाही. इतर समाजाला ज्याप्रमाणे व्यवसाय समाजव्यवस्थेने वहाल केलेत त्याप्रमाणे बेरड समाजाला ठराविक असा व्यवसाय नाही. तेव्हा बेरड समुदायातील लोक हाताला काम मिळेल तो व्यवसाय स्विकारत आहेत. परंतु हे व्यवसाय त्यांचे भावी आयुष्य सावरू शकणारे नाहीत. परिणामी बेरड लोकांचे भविष्य पुढील काळात धोक्याची घंटा वाजवित आहे. तेव्हा केंद्र शासनाने आणि राज्य शासनाने बेरड समाजासाठी अशा काही तरतुदी किंवा योजना, सुविधा उपलब्ध करून द्याव्यात जेणेकरून त्याआधारे बेरड लोक आपले पुढील जीवन व्यवस्थित जगू शकतील. बेरड लोकांना वेगवेगळे उद्योगधंद्यामध्ये, शासकीय बिनशासकीय नोकऱ्यामध्ये काही सवलती द्याव्यात. त्यांच्यासाठी लघू व कुटीर उद्योगधंद्यासाठी व इतर व्यवसायासाठी अनुदान किंवा निधी उपलब्ध करून दयावा.

६. बेरड समुदायाच्या विकासासाठी अनेक घटकातून प्रयत्न केले पाहिजे. शैक्षणिक जाणिवेबरोबरच त्यांच्यामध्ये राजकीय जाणिवसुद्धा निर्माण केली पाहिजे. कारण सद्यपरिस्थितीत बेरड समुदायामध्ये खंबीर अशा नेतृत्वाची गरज आहे. ते नेतृत्व जर बेरड समुदायामधून निर्माण झाले. तरच बेरड समुदायातील ज्या काही समस्या आहेत, ज्या काही अडी-अडचणी आहेत त्या सोडविण्यासाठी मदत होईल. त्यांची बाजू किंवा परिस्थिती किंवा त्यांच्या व्यथा ह्या इतर समाजाप्रमाणेच देशालाही कळतील आणि मग इतर समाजाप्रमाणे देशालाही त्याची जाग येईल. कारण राष्ट्राची प्रगती किंवा विकास करायचा असेल तर प्रथमत: या देशामध्ये राहणाऱ्या प्रत्येक घटकाच्या, व्यक्तीच्या, समाजाच्या अडी-अडचणी, समस्या त्यांचे प्रश्न सोडविले पाहिजे. तरच राष्ट्रविकास

होऊ शकतो, अन्यथा नाही.

७. वेरड समुदायाचे सामाजिक सर्वेक्षण व मुलाखत अनुसूचीद्वारे वेरड समुदायातील वेरड लोकांच्या मुलाखती घेतल्यानंतर असे निदर्शनास आले की, शासनाने सुरू केलेल्या ज्या विविध सुविधा आहेत, त्यापैकी जीवनावश्यक मुलभूत गरजांच्या सुविधा म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व लैंगिक भावना इत्यादी होत. यातील अन्न ही मुलभूत गरजा भागविण्यासाठी जे दारिद्रय रेषेखाली आहेत त्यांना शासनाने रेशन कार्डवर राशन धान्य दुकानातून २ रू किलो गहू व ३ रू किलो तांदूळ तसेच साखर, वेगवेगळ्या प्रकारच्या डाळी, रॉकेल इत्यादी जीवनावश्यक वस्तू कमी किंमतीमध्ये उपलव्ध करून दिलेल्या आहेत, परंतु वरील जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा योग्य प्रमाणात वेरड लोकांना नसलेला दिसून येते. तेव्हा या वस्तूसाठी त्यांना झगडावे लागत आहे. जरी काहींना या वस्तू मिळत असल्या तरी त्या अत्यंत कमी प्रमाणात मिळत असल्यामुळे त्यांच्या गरजा पूर्णपणे भागत नाहीत. परिणामी वेरड लोक शासनाच्या या प्रक्रियेमुळे किंवा अशा सुविधामुळे असमाधानी आहेत. तेव्हा शासनाने यासंदर्भात लक्ष घालून खरी आणि नेमकी परिस्थिती काय आहे ते पहावे. जर व्यवस्थेमध्ये मध्यस्तांचे किंवा भ्रष्ट अधिकाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे असे निदर्शनास आल्यास त्यावर वेळीच लगाम घालावा.